# वेगवान मेट्रोचा नवा पर्याय?

## महामुंबईतील वाहतुकीला वेग देण्यासाठी चाचपणी

**चिन्मय काळे, मुंबई**

chinmay.kale@timesgroup.com

- मुंबईबाहेरील मोठी शहरे थेट जोडणार
- एमएमआरसीच्या अधिकाऱ्यांची दिल्लीभेट
- नव्या पर्यायाची केली चाचपणी

**मटा विशेष**

मुंबईभर मेट्रोचे जाळे उभे करण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे पुढील दहा वर्षांत मुंबई अणि उपनगरामधील प्रवासी ये-जा ही प्रामुख्याने मेट्रोनेच होईल, असे चित्र सध्या आहे. त्यामुळे भविष्यातील वाहतुकीला वेग देण्यासाठी आता जलद मेट्रो येत्या काळात मुंबईत येण्याची शक्यता आहे. यासंदर्भात भूमिगत मेट्रो ३ प्रकल्पाची उभारणी करणाऱ्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडच्या (एमएमआरसी) उच्चाधिकाऱ्यांनी दिल्लीच्या जलद मेट्रो प्रकल्पाला भेट दिली. त्यावेळी या पर्यायाची चाचपणी झाल्याचे समजते आहे.

मुंबई महानगर क्षेत्रविकास प्राधिकरणाकडून (एमएमआरडीए) मुंबईभर सध्या मेट्रो रेल्वेचे जाळे विणले जात आहे. त्याअंतर्गत तीन मार्गिका सुरू झाल्या आहेत. तर जवळपास आठ मार्गिकांचे काम सुरू असून आजवर एकूण १४ मार्गिकांचे नियोजन करण्यात आले आहे. याद्वारे मुंबई शहर, उपनगरासह महामुंबई क्षेत्र एकमेकांशी जोडले जात आहे. परंतु, याबरोबरच भविष्यात मुंबईत 'रॅपिड ट्रान्सपोर्ट' ही जलद मेट्रो मार्गिकाही उभी होऊ शकते. याचसंदर्भात एमएमआरसीएलच्या अधिकाऱ्यांनी दिल्लीच्या प्रकल्पाला भेट दिली.

दिल्लीमध्ये मेट्रोचे जाळे विकसित झाले आहे. पण त्याशिवाय दिल्लीच्या राष्ट्रीय राजधानी क्षेत्रात दिल्लीबाहेरील भागांना जोडण्यासाठी जलद वेगाने धावणारी वाहतूक (पान ४वर)

> "आम्ही या प्रकल्पाच्या चाचणीसाठी दिल्लीला गेलो होतो. या रॅपिड ट्रान्सपोर्टचा वेग ताशी १८० किमी इतका असतो. तो आम्ही अनुभवला. त्यावेळी याविषयी तेथील अधिकाऱ्यांशी तांत्रिक चर्चा करण्यात आली. तसेच या जलद प्रवासाचा नेमका उपयोग जाणून घेण्यात आला.
>
> **- अश्विनी भिडे**, व्यवस्थापकीय संचालक, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड



### अशी असते 'जलद मेट्रो'

एखाद्या शहरातील विविध भागांना कमी अंतरावर जोडण्यासाठी मेट्रो रेल्वेची उभारणी केली जाते. परंतु 'रॅपिड ट्रान्सपोर्ट' अर्थात जलद मेट्रो ही बाहेरून शहरात येणारी मार्गिका असते. शहराच्या मुख्य भागाशी सातत्याने संपर्क येणाऱ्या दूर अंतरावरील उपनगरांना जलदरित्या जोडण्यासाठी याचा वापर होतो. ही रेल्वे ताशी १८० किमी वेगाने धावत असल्याने सहसा एका स्थळापासून दुसऱ्या स्थळापर्यंत थेटच ती असते. परंतु अंतर ३० किमीहून अधिक असल्यास त्यावर अधिकाधिक चार ते सहा स्थानके असते. यानुसार महामुंबईतील कर्जत, कसारा, पनवेल, ठाणे, कल्याण-डोंबिवली, वसई, पालघर हे दूरवरचे भाग अशा 'रॅपिड ट्रान्सपोर्ट' प्रणालीद्वारे मुंबईशी अर्धा तासाच्या आत जोडले जाऊ शकतात. त्यादृष्टीने ही भेट महत्त्वाची ठरली आहे.

## वेगवान मेट्रोचा नवा पर्याय?

(पान एकवरून)

प्रणाली उभी करण्यात आली आहे. या प्रणालीची सध्या चाचणी सुरू आहे. त्यासाठी स्वतंत्र कंपनी स्थापन करण्यात आली असून मेट्रो मार्गिकेशिवाय पूर्णपणे वेगळ्या मार्गावर ही मार्गिका आहे. या प्रकल्पाला एमएमआरसीएलच्या व्यवस्थापकीय संचालिका अश्विनी भिडे, संचालक (प्रकल्प) सुबोध गुप्ता व वरिष्ठ उप महाव्यवस्थापक रॉयल कोरैय्या यांनी भेट दिली. मुंबईत भविष्यात अशाप्रकारची जलद मार्गिका उभी करायची असल्यास काय करता येईल, याबाबत त्यांनी तेथील अधिकाऱ्यांशी चर्चा केली.